# ‘बालकभावा’तील चित्रे (भाग २)

## अनुक्रमणिका


- मनोगत ८
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य १०
- परिचय १३

१. सौ. उमा रविचंद्रन् यांनी काढलेली व्यष्टी आणि समष्टी भाव दर्शवणारी चित्रे अन् त्या चित्रांची वैशिष्ट्ये १४

१ अ. श्रीकृष्णाची शिकवण दर्शवणारी चित्रे १४

१ अ १. श्रीकृष्णाने पित्याप्रमाणे ‘कराग्रे वसते लक्ष्मी...’ या श्लोकापासून दिनचर्येतील आचार शिकवणे १४

१ अ २. श्रीकृष्णाने श्री गणेशाची पूजा करण्यास शिकवणे १७

१ अ ३. प्रत्येक दिवशी देवतेच्या तत्त्वानुसार तिची शक्ती कशी कार्यरत असते, हे श्रीकृष्णाने दाखवणे १९

१ अ ४. श्रीकृष्णाने साधिकेला समृद्ध असलेली स्वर्गभूमी दाखवून भोगभूमी अन् योगभूमी यांतील भेद लक्षात आणून देणे २०

१ अ ५. भारतात साजरा होणारा ‘नवरात्रोत्सव’ आणि पाश्चात्य देशांत साजरा होणारा ‘हॅलोविन’ यांमधील भेद २४

१ आ. ईश्वराचे समष्टी कार्य दर्शवणारी चित्रे २६

१ आ १. मन, बुद्धी आणि अहं व्यापणारी ईश्वराची तीन पावले ! २६

१ आ २. साधकांनी कलियुगात आरंभलेले समुद्रमंथन २९

१ आ ३. द्रौपदीच्या स्थितीमध्ये असलेल्या हिंदू महिलांचे रक्षण केवळ भगवान श्रीकृष्णच करू शकणे ३२

१ आ ४. कलियुगाकडून सत्ययुगाकडे होणारे संक्रमण ३४

१ आ ५. भगवान नरसिंह आणि प.पू. डॉक्टर यांच्या धर्मसंस्थापनेच्या अवतारी कार्यातील साम्य ३८

१ आ ६. एका बालकाने पांडुरंगाच्या मूर्तीवर छत्री धरणे ! ४१

१ इ. कोणतीही सेवा श्रीकृष्णाच्या कृपेने होत असल्याच्या अनुभूती दर्शवणारी चित्रे ४३
१ इ १. संगणकाशी खेळतांनाचे चित्र (संगणकावर सेवा करणे) ४३
१ इ २. कठीण परिस्थितीला सामोरे जातांना श्रीकृष्णाच्या शेल्याच्या मागे लपून आश्रय घेणे ४५
१ इ ३. एका मंदिरातील विश्वस्ताने बाहेर काढल्यावर श्रीकृष्णाने जवळ घेऊन दुसऱ्या घरात नेऊन प्रसार करवून घेणे ४६
१ इ ४. श्रीकृष्णाने बालिकेला उंच उचलल्याचे चित्र ४९
१ इ ५. श्रीकृष्णाने बालिकेला उंच उचलल्याचे चित्र श्रीकृष्णानेच काढले असल्याची साक्ष असून स्वतः त्याकडे आश्चर्याने पहात असणे ५०
१ इ ६. प्रत्यक्ष श्रीकृष्ण चित्र काढण्यासाठी पुढ्यात उभा असणे ५१
१ इ ७. श्रीकृष्ण नेतृत्व करत असलेल्या धर्मयुद्धात सहभागी होऊन श्रीकृष्णाचा घाम पुसण्याची सेवा करणे ५३
१ इ ८. क्षात्रभाव जागृत होऊन हातात तलवार घेणे ५५
१ ई. रामनवमीच्या दिवशी जयपूर येथील श्री लक्ष्मी नारायणाचे चित्र ५७
१ उ. सनातनमधील काही आनंददायक घटना दर्शवणारी चित्रे ६०
१ ऊ. प.पू. डॉक्टरांच्या संदर्भातील अनुभूती दर्शवणारी चित्रे ६७
२. सौ. उमा रविचंद्रन् यांची चित्रे पाहून सनातनच्या साधकांना आलेल्या अनुभूती, तसेच त्या चित्रांतून त्यांना सौ. उमा रविचंद्रन् यांची जाणवलेली आध्यात्मिक गुणवैशिष्ट्ये ७५
३. सौ. उमा यांनी काढलेल्या चित्रांची सनातनच्या साधिका-चित्रकारांना जाणवलेली वैशिष्ट्ये अन् त्यांना आलेल्या अनुभूती ७७
४. सौ. उमा यांनी काढलेली चित्रे पाहून गोपींना आलेल्या अनुभूती ८०
५. प.पू. डॉ. आठवले आणि सनातनचे विविध संत यांनी सौ. उमा रविचंद्रन् यांच्या चित्रांविषयी काढलेले उद्गार ८४

## मनोगत

‘भाव’ या शब्दापासूनच अध्यात्मविश्वाला आरंभ होतो. साधक, संत यांचा ईश्वराप्रतीचा उत्कट भाव विविध माध्यमांतून व्यक्त होतो. ही अभिव्यक्ती अनेकदा अजोड कलाकृतींना जन्म देते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासारख्या अनेक संतांच्या उत्कट भावातून निर्माण झालेल्या रचना अवीट गोडीच्या ठरल्या आहेत. हे वाङ्मय भाषा, व्याकरण आदी दृष्ट्याही परिपूर्ण असल्याचे आढळते. चांगली साधना असलेल्या साधकाकडूनही त्याची भावावस्था विविध कलांच्या माध्यमातून व्यक्त होते आणि ही कलानिर्मिती निर्दोष अन् आनंददायी असते. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सनातन संस्थेच्या चेन्नई (तामिळनाडू) येथील साधिका सौ. उमा रविचंद्रन् यांची चित्रे.

सौ. उमा यांनी काढलेल्या बालकभावाच्या चित्रांची त्यांतून सेवाभाव व्यक्त होणे, चित्रे पहाणाऱ्याचा कृतज्ञताभाव जागृत होणे इत्यादी अनेक आध्यात्मिक वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या चित्रांकडे कलेच्या दृष्टीने पाहिल्यासही ती अत्यंत सुरेख असून त्यांत चांगल्या चित्रांमध्ये आढळणारे अनेक पैलू दिसून येतात, उदा. ‘श्रीकृष्णाचे घर्मबिंदू (घाम) टिपण्याची सेवा करणारी बालिका’ या चित्रात श्रीकृष्णाच्या मानेवरील घाम पुसण्यासाठी बालकभावातील साधिका चवड्यावर उभी आहे. असे अनेक बारकावे प्रत्येक चित्रात आढळून येतात.

आध्यात्मिक गोडवा असलेली आणि बालकांत असलेली निर्मळता अनुभवायला देणारी ही चित्रे आबालवृद्धांना आवडतीलच, त्याचप्रमाणे साधनेत भाववृद्धीसाठी साहाय्यकही ठरतील.

**सौ. उमा रविचंद्रन् ( उमाक्का ) यांची वैशिष्ट्ये**

१. सौ. उमा यांच्यात श्रीकृष्णाविषयी बालकभाव असूनही विविध चित्रे काढल्यानंतर त्यांना काही चित्रांविषयी सारणीच्या स्वरूपात आध्यात्मिक ज्ञानही मिळाले आहे. हे सनातनमधीलच नव्हे, तर पृथ्वीवरीलही एकमात्र उदाहरण असावे !

२. सौ. उमाक्कांनी काढलेली चित्रे हे चित्रांच्या माध्यमातून ‘बालकभाव’ अवर्णनीयरित्या व्यक्त होण्याचे इतिहासातील एकमेव उदाहरण आहे !

३. भक्तीमार्गात काही जण बालकभावात, तर काही जण गोपीभावात असतात. दिवसभर हे त्याच भावात असतात. सौ. उमा रविचंद्रन् यांचे वैशिष्ट्य हे की, त्या चित्र काढण्यापुरत्या बालकभावात असतात. इतर वेळी मात्र कौटुंबिक आणि धर्मजागृतीचे उत्तरदायित्व सांभाळत असतांना त्या त्या अवस्थेत असतात. त्यामुळे सौ. उमा व्यष्टी आणि समष्टी अशा दोन्ही प्रकारच्या साधना करू शकतात. यामुळेच त्यांची प्रगती जलद होत आहे. – **संकलक**